| MHOS130005592018 | **म.सं.कौ.हिं.का.अर्ज नं. ०९/२०१८ मधील निशाणी क्र.१३ वरील आदेश**<br>**(प्रियंका धनंजय खोले वि. धनंजय सोमनाथ खोले व इतर)**<br>*CNR No. MHOS13000559-2018* |
|---|---|

१. अर्जदाराने प्रस्ततचा अर्ज मुख्य अर्जाचा अंतिम आदेश होईपर्यन्त मुख्य अर्ज दाखल तारखेपासून अर्जदारास दरमहा रू. १०,०००/— अंतरीम पोटगी देण्याचा आदेश व्हावा म्हणुन दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे प्रस्तूत अर्जातील कथने थोडक्यात अशी की, तिने मुख्य अर्जात घरगुती हिंसापासून महिलांचे संरक्षण या खाली तिच्यावर झालेल्या घरगुती हिंसाबाबत, नुकसान भरपाई व पोटगीबाबत या न्यायालयात दाद मागीतलेली आहे. तिचा विवाह दि.२०.११.२०१३ रोजी गैरअर्जदार नं.१ याचेबरोबर पुणे येथे हिंदु धर्म शास्त्राप्रमाणे झालेला आहे. ती गैरअर्जदार नं.१ ची लग्नाची कायदेशीर पत्नी असून त्यांचे पती पत्नीचे नाते कायम अस्तित्वात आहे. तिचे वडिलांनी गैरअर्जदार यास ५ तोळे सोने देवून लग्न करून दिलेले असून तिचे लग्नात जवळपास ३ लाख रूपये खर्च केला आहे. तिला गैरअर्जदारापासून वैवाहिक संबंधातून कसलेही अपत्य झालेले नाहीत. गैरअर्जदार नं.२ ही गैरअर्जदार नं.१,३,५ यांची आई व तिची सासू आहे. तर गैरअर्जदार नं. ३ व ५ हया गैरअर्जदार नं. १ च्या सख्या बहिणी असून तिच्या नंदा आहेत, तर गैरअर्जदार नं. ४ व ६ हे तिचे नंदावे आहेत. गैरअर्जदार नं. ७ हा गैरअर्जदारांचा जवळचा नातेवाईक आहे. ती व गैरअर्जदार नं.१ ते ७ हे एकत्रच राहत होते. लग्नानंतर ती गैरअर्जदाराच्या घरी गैरअर्जदाराबरोबर नांदावयास गेली. तिला लग्नापासूनच गैरअर्जदारांनी नाही नाही तो त्रास दिला. गैरअर्जदार तिच्याविरोधात खोटे आरोप करत असे. गैरअर्जदार नं. १ हा तिला फोटोग्राफीच्या व्यवसायासाठी व दुकानाला गाळा घेण्यासाठी माहेरावरून एक लाख रूपये मागणी करून तिला मारहाण करत असे, त्यामूळे तिच्यावर विपरीत परिणाम होतो.

३. अर्जदाराने पुढे कथन केले की, गैरअर्जदार हे खाण्या पिण्यास, अन्न व कपडेलत्ते देत नसे. परंतू तिच्या आई वडिलांची आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्यामूळे ती गैरअर्जदाराची करणी धरणीची मागणी पुर्ण करू शकली नाही. म्हणून गैरअर्जदार हे तिला मारहाण करत असे व शारीरिक व मानसीक त्रास देत असे. सदरी त्रास सहन करूनही ती गैरअर्जदाराबरोबर त्याच्या घरात नांदतच होती. ती तिच्या भवितव्याचा विचार

करून गैरअर्जदाराबरोबर संसार करू लागली. गैरअर्जदाराच्या वागणुकीत काहीच बदल झालेला नसून तो आजही तिला पूर्वी इतकाच त्रास देत आहे. दिनांक ०१.०५.२०१८ रोजी गैरअर्जदार याने तिला परत जिवघेणी मारहाण केली, मारहाणीचे कारण त्याच्या विवाह बाहयसंबंधची तीने गैरअर्जदाराकडे चौकशी केल्यामूळे गैरअर्जदाराने तिला मारहाण केली. तिला गैरअर्जदार रात्री बेरात्री मारहाण करून घरातून हाकलून देत असे व त्यामूळे ती तिच्या आई वडिलाकडे येत असे. नंतर तिचे आई, वडील व इतर नातेवाईक तिला सोबत घेवून गैरअर्जदाराचे घरी जात असे व त्यांना विनंतीकरून तिला ठेवून येत असे, असे पुष्कळ वेळेस झालेले आहे. तिला गैरअर्जदारास दि.०२.०५.२०१८ रोजी मौजे भूम ता.भूम येथे आणुन सोडले व म्हणाला की, तु मला लागत नाही, तु माझी बायको नाही, येथून पुढे तु त्याच्याकडे यावयाचे नाही, मी तुला सांभाळणार नाही असे म्हणून तिला सोडून निघून गेला. त्यानंतर गैरअर्जदार याने तिला सतत आजपर्यंत त्रास देण्याचे चालूच ठेवले आहे.

४. अर्जदाराने पुढे कथन केले की, गेल्या १० दिवसात ती, तिचे आई, वडिल व इतर नातेवाईक पुष्कळ वेळेस गैरअर्जदाराच्या घरी गेले व त्याला तिला नांदवण्याची व सांभाळण्याची विनंत्या केल्या. परंतू प्रत्येक वेळेस गैरअर्जदार याने तिला नांदवण्यास व सोबत घरात ठेउन घेण्यास नकारच दिला. त्यामूळे तिला नाविलाजास्तव आई वडिलांकडे राहत आहे. गैरअर्जदाराची तिच्याबरोबर संसार करण्याची इच्छाच नाही. गैरअर्जदाराला ती पत्नी म्हणून पसंत नाही. गैरअर्जदाराची दुसरे लग्न करण्याची इच्छा आहे. गैरअर्जदार हा तिच्याकडे हमेशा संशयी नजरेने पाहत होता व तिचा छळ करत होता. गैरअर्जदार हा तिचा पावलो पावली अपमान करत होता. गैरअर्जदार हा तिला टोचून बोलत होता. ती कधीही गैरअर्जदाराच्या घरातून गूपचूप त्यांना न सांगता माहेरी आलेली नाही. गैरअर्जदाराचे बॅकेत खाते आहे. ज्यावर गैरअर्जदाराने व्यवहार करू नये म्हणून आदेश होणे न्याय आहे. तिच्याकडे काही एक उत्पन्नाचे साधन नाही. ती सध्या उपाशीपोटी जिवन जगत आहे. ती स्वत:चा चरितार्थ चालवण्यास आणि खर्च करण्यास असमर्थ आहे. तिला मोल मजूरीचे किंवा कलाकुसरीचे काम येत नाही. तिला सांभाळण्याची कायदेशीर जबाबदारी गैरअर्जदाराची असून ती गैरअर्जदारावरच अवलंबून आहे.

५. अर्जदाराने पुढे कथन केले की, गैरअर्जदार नं.१ हा न्यू इंग्लिश पॉलिटेक्नीक कॉलेज शाहुपुरी सातारा येथे क्लार्क म्हणून नोकरीस असून त्यास दरमहा रू.

१२,०००/— पगार मिळतो. तसेच गैरअर्जदार नं.१ हा नोकरी बरोबर फोटो ग्राफी व्यवसाय करत असून त्यास दरमहा रू. ३०,०००/— रूपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदार नं.२ ही नोकरीस असून तिला दरमहा रू. ३०,०००/— पगार मिळतो. गैरअर्जदाराला ०२ गुंठे जागेत २ मजली इमारत असून त्यामध्ये ५ ते ६ खोल्या असून गैरअर्जदाराने वरचा मजला दरमहा रू. ५०००/— प्रमाणे भाडयाने दिला आहे. गैरअर्जदारांचे सर्व मार्गाने मिळून खर्च वजा जाता दरवर्षी १५ ते २० लाख रूपयाचे वार्षीक उत्पन्न आहे. म्हणून गैरअर्जदारास उचलून पोटगी देउ शकतो. सध्या जिवनावश्यक वस्तुंच्या किंमती भरमसाठी वाढलेल्या आहेत. ती घरातील संपुर्ण कामे व्यवस्थीत करत होती, तीला गैरअर्जदार हा पती म्हणुन पसंत आहे, ती हमेशा समजुतीने वागत होती, भांडण तंटा करीत नसे, तिला गैरअर्जदार किंवा इतर कोणी कधीही घेवून जाण्यासाठी भूम येथे आले नव्हते व ती त्यांना कधीही फारकत घ्या किंवा दुसरे लग्न करा असे म्हणाली नाही. तिचा स्वभाव हा प्रेमळ व सहनशिल आहे. उलट गैरअर्जदाराचा स्वभाव हा रागीट व उध्दट आहे. तो तिला जाणीवपूर्वक त्रास देवून मानसीक व शारिरीक छळ करत आहे, तिला मारहाण करून त्यांच्या घरातून हाकलून दिले आहे, तिला करणी धरणीची मागणी केलेली आहे.

**६**. अर्जदाराने शेवटी कथन केले की, ती गेल्या १० ते १२ दिवसापासून भूम ता.भूम येथे राहत आहे, तिने सदरच्या काळात गैरअर्जदारास नांदवण्याच्या विनंत्या केल्या. परंतू त्याने नकारच दिला, गैरअर्जदाराने तिला सोडचिठ्ठी दे असे म्हणाले, को—या स्टॅम्पवर गैरअर्जदार तिला सहया कर म्हणत होता, तिला अन्नधान्य, कपडेलत्ते व औषध पाण्यासाठी रू.१५,०००/— प्रतिमहिना, घरगूती खर्चासाठी रू.२,५००/— प्रतिमहिना व घरभाडे व इतर खर्चासाठी रू.२,५००/— असे एकूण रू.२०,०००/— अर्जदारास दरमहिना उदर निर्वाहसाठी पोटगीची गरज आहे. सदरी दरमहा रू.२०,०००/— अर्जदारास पोटगीची गरज आहे. ती अत्यंत गरीब असून तिच्या आई वडिलांचीही परिस्थिती अतिशय हालाखीची असून तिला स्वत:चा उदरनिर्वाह करणे कठिण झालेले असून तिच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. तसेच तिला सध्याच्या परिस्थितीमध्ये कपडेलत्ता, काही जिवन आवश्यक वस्तुचीही गरज भासणार आहे. ती असाहय झाल्यामूळे तिला व वस्तुची पुर्तता होण्यासाठी तिने मागीतलेल्या अर्जाचा निकाल लागेपर्यंत तिला दरम्यानच्या काळात अंतरीम पोटगीचा आदेश गैरअर्जदाराविरूध्द होणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच तिला सध्या राहण्यासाठी व औषध उपचारासाठी खर्च होणार आहे. म्हणून तिला असा आदेश

गैरअर्जदाराविरोधात करणे गरजेचे आहे. सदरील अर्जामध्ये अर्जदाराने गैरअर्जदाराची आर्थिक ऐपत प्रथम दर्शनी सिध्द केलेली आहे. तसेच अर्जदारावर झालेला अन्याय व जाच चुलूमाचीही प्रथम दर्शनी केस सिध्द केली आहे व तसा अंतरिम आदेश करण्याचेही अधिकार विद्यमान न्यायालयास आहेत. तसेच अर्जदार हिला दिलेला अर्ज हा मंजूर होण्याची पुर्ण खात्रीपण आहे. म्हणून अर्जदार हिला दरमहा रू. १०,०००/— अंतरीम पोटगीचा आदेश होणे न्याय व योग्य होणार आहे असे कथन केले.

७. सामनेवाले क्रं. १ व २ हे हजर झाले व त्यांनी मुळ अर्ज व प्रस्तूत अर्जाला नि.११ वर म्हणणे दिले व त्याबाबत नि. १९ वर पुरशीस दिली. सामनेवउले क्रं. ५ व ६ यांनी नि.२१ वर पुरशीस देवून सामनेवाले क्रं. १ व २यांचे म्हणणे स्वीकारले. अर्जदाराने नि. २२ वर पुरशीस देवून सामनेवाले क्रं. ३ व ४ यांचे विरूध्द अर्ज काढून घ ेतला. सामनेवाले क्रं. १ व २ यांनी त्यांच्या म्हणण्यात अर्जदारासोबत दिनांक २०.११. २०१३ रोजी पुणे येथे हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे विवाह झाल्याचे मान्य करून सर्व मजकूर नाकारले. त्यांनी पुढे कथन केले की, अर्जदार व सामनेवाला क्रं.१ यांचा विवाह दिनांक २०.११.२०१३ रोजी पुणे येथे कुलवंत वाणी समाजाचे मांगल्य मंगल कार्यालय, श्री दगडूशेठ दत्तमंदिर शेजारी बुधवार पेठ येथे झाला व तो अद्याप अस्तित्वात आहे. सदर चा विवाह हा ठरवून तसेच दोघांचे कुंटूब यांना समजून उमजून झालेला आहे. सदर विवाह कामी त्यांचे मामा श्री सुधीर कडेकर हे मध्यस्ती होते तसेच अर्जदाराचे देखील नातेसंबंध जाबदेणा—यांचे मामा सोबत होते. सामनेवाला क्रं. १ ने पुढे कथन केले की, त्याचे लग्न करण्याचे ठरविले त्या वेळेस त्याचे मामा सुधिर कडेकर यांनी सदर अर्जदाराचे स्थळ दाखवले त्या वेळेस त्यांना अर्जदार व त्यांच्या कुटूंबीयांनी खोटया स्वरूपाची जन्मतारीख सांगितली तसेच हिंदु धर्मशास्त्रानुसार लग्न जुळवण्याकामी लागणारी माहिती खोटया स्वरूपाची पाठवली त्या माहिती नुसार अर्जदार व त्याचे लग्न पत्रिकेतील गुण जुळत होते तेथेच प्रथम फसवणुक अर्जदार यांनी जाबदेणार यांची केली.

८. सामनेवाला क्रं. १ व २ ने पुढे कथन केले की, तद्नंतर लग्न जुळवण्याकामी एकमेंकांची पाहणी होवून पसंती झाली व लग्न ठरवण्याकामी अर्जदार यांचे मामा श्री. संजय व्हराडे, रा. चिंचवड गांव, ता. पुणे यांच्या घरी बैठक झाली. सदर बैठकीत जवळचे काही ठराविक पाहूण्यांची उपस्थिती होती. त्यावेळेस अर्जदार व त्याचा विवाह ठरला व सुपारीचा कार्यक्रम झाला व त्यानंतर लग्नसोहळा पुणे येथे पार पडला,

सदरच्या लग्न कामी त्याने अर्जदाराच्या अंगावर अंदाजे ३ ते ४ तोळे सोने घतले असा मिळून अंदाजे ३ ते ४ लाख खर्च झाला सदरचा खर्च त्यांची ऐपत नसताना पाहूण्यांकडून व मित्राकडून हात उसनवार तसेच व्याजाने आणून केला तसेच त्या कामी त्यांनी आज रोजी देखील कर्ज काढून सदरचा खर्च भागवाभागवी करत आहे. सदरचे विवाह सोहळा पार पडल्यानंतर अर्जदार हिच्या आई वडील तिला मंगल कार्यालयातून सासरी पाठवणूक करण्याकरिता देखील थांबले नाहीत. त्यामूळे संपूर्ण जबाबदारी आमच्ययावर आली व आम्ही सर्व कार्यालयातील हिशोब आवराअवरी करून अर्जदार हिस मौजे सातारा येथे आमच्या घरी नांदवण्यास नेली. ४ दिवसांनी पुजा देवदेव झाले त्यात तिचे आई वडील व पाठराखीन म्हणून आलेल्या आत्या व तिचा चुलत भाऊ एवढीच जण आले होते. लग्न झाल्यावर काही महिन्यानंतर देखील अर्जदार जास्त बोलत नसे कोणाच्यात मिसळत नसे. ०३ मे २०१४ रोजी माझ्या मित्राचे लग्न होते मला त्या लग्नाचे फोटो काढण्याचे काम होते. त्यामूळे तो सकाळी लवकर गेला होता व अर्जदार हिस लग्नास येणेकामी त्याने मित्रास अर्जदारास आणण्यास घरी पाठवले असता अर्जदार ही लग्नाला येते नाही असे सांगीतले. दरम्यान अर्जदार दुपारपासून तिचे खोलीतून बाहेर आलीच नाही मी रात्री उशीरा घरी गेलो असता अर्जदार दार देखील उघडत नव्हती.

९. सामनेवाला क्रं. १ व २ ने पुढे कथन केले की, त्याने अर्जदारास दार उघ ाडणे कामी विनवनी केली असता देखील अर्जदार दरवाजा उघडत नव्हते, दार वाजवले शेजारील लोक जागे झाले पण अर्जदार यांनी दार उघडले नाही, दाराला जोरात धक्का मारून दाराची आतील कडी तुटून जाबदेणार आत गेले व त्यांनी अर्जदारास विचारणा केली असता अर्जदार हिने जाबदेणा—यास उलटसुलट उत्तरे दिली व वेडयासारखी हसत होती. त्यावेळेस त्याला तीच्या वागण्याचा प्रचंड मोठा धक्का बसला. त्यानंतर आमच्या घ ारच्याबरोबर अर्जदार ही विचित्र वागू लागली. म्हणजेच ती कोणाशी ही न बोलणे कोणतेही काम न करणे दिवसभर एका खोलीत बसून राहणे. तिला कांही विचारले असता विचित्र उत्तर देणे अथवा न बोलता दुसरीकडे एकटक बघत बसणे, सदरची लक्षणे हि अत्यंत धक्कादायक होती. त्यामूळे आम्ही अर्जदारास डॉक्टरांकडे घेवून गेलो. त्यावेळेस आम्हाला प्रथम कळाले की अर्जदार ही मनोरूग्ण आहे व ही सर्वात मोठी गोष्ट अर्जदार व तिच्या आई वडिलांनी आमच्या पासून लपवून ठेवली. अर्जदार ही लहानपणपासूनच मनोरूग्ण आहे. तेंव्हा आम्ही अर्जदाराच्या आई वडीलांस सदरची बाबत सांगितली असता

त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देवून आम्हाला शिवीगाळ व दमदाटी केली की डॉक्टरांकडे तुम्ही का घेवून गेला. अर्जदार व तीच्या घरच्यांनी आम्हांला व आमच्या घरच्यांना फसवून सदरचा विवाह केला आहे. आम्ही अत्यंत गरीब स्वभावाचे असल्याने आम्हाला सदरच्या घ टनेचा खूप मोठा धक्का बसला तरी देखील अर्जदाराच्या प्रेमापोटी ते तिला संभाळत होते तसेच सर्व दवाखाना खर्च करीत होते. तो व त्याची आई हे दोघेच घरी राहत असून त्याची मोठी व छोटी बहीण त्यांच्या सासरी राहतात. अर्जदाराच्या अश्या वागण्याने त्या देखील त्यांच्या घरी येत नव्हत्या.

**१०.** सामनेवाला क्रं. १ व २ ने पुढे कथन केले की, तसे असताना त्याचे वडील हे तो लहान असतानाच वारले तेंव्हा संपूर्ण जबाबदारी त्याच्या आईवर आली व तिने देखील त्याला चांगल्या प्रकारे संभाळून लहाणाचे मोठे केले. आता त्याच्या आईचे वय झाले आहे, ती शिपाई म्हणून विनाअनूदाणीत तत्वावरील शाळेत काम करीत होत्या व त्यातूनच त्याचा संभाळ करीत होत्या व आहे. तसेच त्याची आई ही दिवसभर कामास बाहेर आसायची त्यामूळे तिचा आणि अर्जदार हिचा संबंध थोडावेळच येत होता. तेंव्हा सुध्दा त्याची आई अर्जदार हिस स्वतःच्या मूलीप्रमाणे वागवत होत्या तसेच घरातील संपूर्ण कामे त्याची आईच करीत होती व आहे. त्याची आईने अर्जदार हिस कधीही त्रास होईल अशी वर्तणूक केली नाही. याउलट अर्जदार हिनेच त्यांना खुप मोठा मानसिक त्रास दिला व देत आहे. असे असताना त्यांनी संसार टिकवण्यासाठी अर्जदार हिच्या सोबत गपगूमान राहत होते परंतू अर्जदार ही मानसिक रूग्ण असल्याने कधी काही वागेल ते सांगता येत नव्हते. तसे असतानाच दिनांक २२ एप्रिल २०१६ रोजी मित्राचे वाढदिवासाचे कार्यक्रमावरून घरी आलो व सांगितले की मला जेवायचे नाही तर अर्जदार यांनी माझा गळा धरला व बनियन फाडला. त्या सर्व प्रकारामूळे त्याचे आईस अस्वस्थ वाटू लागले. मग आम्ही शांत होवून झोपण्याचा प्रयत्न करत होतो इतक्यात अर्जदारही त्याचा मोबाईल घेवून १०० नंबर ला फोन लावला व तिचा नवरा तिला मारत आहे, आपण लवकर या असे सांगितले. त्यानुसार त्याला परत शाहपूरी पोलीस स्टेशन मधून फोन आली की, सातारा मध्ये एक गंभीर घटना घडली असून सगळे पोलीस तिकडे गेले आहेत. तुम्ही सकाळी या असे त्यांनी सांगीतले. परंतू अर्जदार त्यांचे देखील न ऐकता रात्रीचे २.३० वाजता एकटी चालत पोलिस स्टेशनला निघाली. तिच्या मागे गाडी काढून आम्ही अर्जदार यांच्या मागून पोलीस स्टेशनला गेलो, तिथे गेलो असता पोलीसांनी सगळी पार्श्वभूमी

विचारली व तिला योग्य उपचार दया असे त्यांना सांगून तेथून जाण्यास सांगितले.

**११**. सामनेवाला क्रं. १ व २ ने पुढे कथन केले की, त्यानंतर दोन ते तीन महीन्यानंतर काही कारण नसताना अर्जदार ही कोणासही काही न सांगता तिचे सर्व सामान घेवून घरातून निघून गेली. त्यावेळेस त्यांनी तिला खूप शोधले परंतू ती सापडली नाही. दुस—या दिवशी अर्जदार हिच्या घरी फोन केला असता ती तिथे असल्याचे समजले, त्यानंतर देखील त्यांनी अर्जदारास फोन करून घरी येण्याचे सांगितले परंतू अर्जदार घरी येण्यास नकार दिला. तसेच त्यांना मध्यस्थी व नातेवाईक यांच्याकडून अर्जदार हिस नांदण्यास घेवून येण्याकरिता विनवनी केली परंतू अर्जदार ही आली नाही व या उलट अर्जदार व तिच्या घरच्यांनी त्यांना शिवीगाळ व दमदाटी केली. त्यांना सदर घटणेचा खुप धक्का बसला तसेच त्याला त्याच्या कामावरून काढून टाकण्यात आले आता त्याच्याकडे कोणताही काम धंदा नसून तो घरात बसून असतो. त्याची आईच त्याला संभाळत आहे. त्याला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. मुळातच अर्जदार ही अत्यंत लाडात व ऐश आरामात वाढलेली आहे. त्यांचे घर छोटे असल्यामूळे त्या घरात रहाणे ती पसंत करत नव्हती. त्यामूळे ती वारंवार काही कारण नसतांना माहेरी जावुन रहात असे. त्याच्या आईचे नांवे त्याच्या वडिलांनी खरेदी केलेली एक गुंठा जागेत ३ खोल्या बांधल्या असुन त्यामध्ये जाब देणार नं.१ रहात आहेत. तसेच सदरचे घरापासून त्यांना कोणतेही उत्पन्न मिळत नाही. त्यामूळे अर्जदार हिचे त्याच्याकडे नांदणेसाठी मन रमत नाही. याउलट अर्जदार हिचे माहेरीकडील परिस्थिती अत्यंत चांगली असून अर्जदार हिचे वडिलांचे मोठे किराणा मालाचे दुकान आहे. तसेच त्यांना १४—१५ एकर बागायती शेत जमिन आहे. त्यापासून अर्जदार हिचे वडिलांना व भावांना भरपुर उत्पन्न मिळत असुन ते छानछुकीत दिवस काढत आहेत. अर्जदार यांनी त्यांची खुप मोठी फसवणुक केलेली आहे. तसेच खुप आर्थिक, मानसिक, शारीरिक स्वरूपाचा अधिक खर्च केलेला आहे. त्यामूळे त्यांच्यावर आज देखील खूप कर्ज आहे. त्यांनी अर्जदाराविरूध्द मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सातारायांच्याकडे मॅरेज पिटीशन नंबर २४४/२०१७ हे दाखल केले असून त्यामध्ये अर्जदार जाणूनबूजून हजर राहत नाही. सबब सदरील अर्जदार यांनी केलेला अर्ज पुर्णपणे खोटा व लबाडीचा व मे. कोर्टाची दिशाभूल करणारा आहे सदर अर्जदार यांनी स्वता:हून संसाराचा त्याग केला आहे. त्यांना दवाखाण्यात रू.५०,०००/— खर्च लागला आहे. सबब अर्ज नामंजूर करावा असे कथन केले.

**१२.** मी अर्जदाराचे वकील व गैरअर्जदाराचे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच सामनेवाला क्रं.१ व २ यांनी **नि. १७** वर दिलेल्या युक्तीवादाचे अवलोकन केले.

**१३**. वर नमुद विस्तृत अर्जदार व सामनेवाले यांच्या कथनाचे मी अवलोकन केले. त्यांच्या कथनावरून त्यांना एकमेकांचे नमूद नातेसंबंध मान्य असल्याचे तसेच त्यांना त्यांचा झालेला विवाह मान्य असून तो अद्याप अस्तित्वात असल्याचेही मान्य असल्याचे दिसते. अर्जदाराने प्रस्तूत अंतरीम पोटगीच्या अर्जात सामनेवालाविरूध्द मुळ अर्ज केल्याप्रमाणे गंभीर कथने व आरोप केल्याचे दिसते. सामनेवाल्याने अर्जदाराने केलेली सर्व कथने व आरोप नाकारून अर्जदाराविरूध्द कांही गंभीर स्वरूपाचे आरोप केले आहेत. प्रस्तूत अंतरीम पोटगीचा अर्ज निकाली काढतेवेळी प्रथमदर्शनी कौटूंबिक हिंसाचार झाला आहे किंवा नाही व सामनेवाल्याची उत्पन्नाची मर्यादा प्रथमदर्शनी ओळखून अर्ज निकाली काढणे अपेक्षित आहे. अर्जदार हिने प्रस्तूत अर्जात केलेली सर्व कथने **नि.१४** वर शपथपत्र देवून त्याला पृष्टी दिली आहे. सामनेवाला क्रं.१ व २ तर्फे **नि.११** वर दिलेल्या त्यांच्या म्हणण्याला **नि.१२** वरील शपथपत्राने सामनेवाला क्रं.१ ने पृष्टी दिली आहे. त्यावरून अर्जदार व सामनेवाले क्रं.१ यांनी परस्पर विरोधी कथने व आरोप करून त्याबाबत स्वता:चे शपथपत्र न्यायालयात दाखल केल्याचे दिसते. त्यामूळे दोन्ही बाबतीबाबत दोन्ही पक्षकारांनी परस्पर शपथपत्र दिले असल्याने प्रथमदर्शनी कौटूंबिक हिंसाचार झाला किंवा नाही हे पाहणे आवश्यक दिसते. वरील कथनावरून अर्जदार व सामनेवाला क्रं.१ हे एकमेकापासून दि.२.५.२०१८ पासून वेगळे राहत असल्याचे व प्रस्तूत मूळ अर्ज दि. २५.५.२०१८ रोजी दाखल केल्याचे दिसते. अर्जदार ही सामनेवाला विरूध्द गंभीर आरोप करताना त्यांनी तिला नांदविण्यास नेल्यापासून त्रास दिल्याचे, खोटे आरोप केल्याचे, फोटोगॉफीच्या व्यवसायासाठी दुकानाला गाळा घेण्यासाठी अर्जदाराला पैश्याची मागणी केल्याचे, ती पूर्ण झाली नसल्याने मारहाण केल्याचे, खाण्यापिण्यास न देवून करणीधरीणची मागणी केल्याचे, दि. १.०५.२०१८ रोजी जिवघेणी मारहाण सामनेवाला क्रं. १ ने त्याच्या विवाहबाहय संबंधाबाबत विचारणा केल्याने केल्याचे, दि. २.५.२०१८ रोजी तिला भूम येथे आणून सोडचिठ्ठी मागण्याचे, त्यानंतर घरात घेण्यास नकार दिल्याचे, संशयी नजरेने पाहिल्याचे व वेळोवेळी अपमान केल्याचे कथन केले आहे.

**१४**. सामनेवाल्याने अर्जदाराविरूध्दही गंभीर आरोप करताना तिच्यासोबत लग्न झाल्याचे मान्य केले परंतू लग्न पत्रिकेत गुण जूळविण्यासाठी खोटी जन्मतारीख दिल्याचे,

तिचे आईवडिल तिला लग्न झाल्यानंतर सासरी पाठविण्यासाठी थांबले नसल्याचे, त्याने मित्राच्या लग्नासाठी अर्जदाराला बोलाविले असता ती न येता घरामध्ये दरवाजा बंद करून बसल्याचे, दार कडीतोडून आत गेल्यानंतर अर्जदाराने उलटसुलट व वेडयासारखी हसत उत्तरे दिल्याचे, विचीत्र वागण्याचे न बोलणे, खोलीत झोपून राहणे, एकटक बघणे अशी मनोरूग्णसारखी वागल्याचे गंभीर आरोप करून अर्जदार ही लहानपणापासूनच मनोरूग्ण असल्याची बाब लपवून ठेवल्याचे, त्यावरून त्यांची फसवणूक केल्याचे कथन केले आहे, त्याची आई अर्जदारासोबत मूलीप्रमाणे वागत असतानाही तिने त्याच्या आईला त्रास दिल्याचे कथन केले आहे, दि.२२ एप्रिल २०१६ रोजी मित्राच्या वाढदिवसाचे कार्यक्रमावरून घरी आल्यावर त्याने जेवायचे नाही असे सांगितल्यावर त्याचे गळयाला धरून बनियन फाडून स्वता: १०० नंबरला फोन लावून पोलिसांना नवरा मारत असल्याचे सांगून स्वता: रात्री २.३० च्या दरम्यान एकटी चालत पोलीस स्टेशनला निघून गेल्याचे, पोलीसांनी तिची बाजू ऐकूण तिला उपचार करण्याचे सांगितल्याचे, अर्जदार स्वता: निघून गेल्याचे व नांदण्यास येणार नसल्याचे कथन करून शिवीगाळ व दमदाटी केल्याचे कथन केले आहे.

**१५**. सदर अर्जदार व सामनेवाला यांच्या कथनाचे अवलोकन केले असता त्यांनी एकमेकाविरूध्द गंभीर स्वरूपाचे आरोप केल्याचे दिसते. सामनेवाल्याने अर्जदाराविरूध्द मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, सातारा यांच्याकडे अर्ज केल्याचे तसेच त्यामध्ये अर्जदार हजर राहत नसल्याचेही कथन केले आहे. यावरून अर्जदार व सामनेवाले यांच्यातील नातेसंबंध ठिक नसल्याचे तसेच ते कथीत वेळेपासून वेगवेगळे राहत असल्याचे स्पष्ट होते. अर्जदाराने केलेल्या गंभीर कथनावरून व **नि.१४** वर दिलेल्या शपथपत्राचा आधार घेवून प्रथमदर्शनी अर्जदाराचा घरगुती हिंसाचार झाला नाही असे म्हणता येणार नाही. अर्थात त्याबाबत घरगुती हिंसाचाराबाबत पुरावा न्यायालयासमोर अद्याप आलेला नसुन तो अर्जदार व सामनेवाला यांना प्रकरणादरम्यान देता येणार आहे. परंतू कथने गंभीर असून कौटुंबीक हिंसाचाराची व्याख्या पाहता तो झाला नाही असे प्रथमदर्शनी म्हणता येणार नाही. अर्जदाराला व सामनेवाल्याला त्यांच्यातील नातेसंबंध मान्य आहेत. सामनेवाला क्रं.१ याने अर्जदार ही त्याची पत्नी असून त्यांच्यातील नातेसंबंध अद्याप अस्तित्वात असल्याचे मान्य केले आहे. त्यामूळे अर्जदार हिच्या पालनपोषनाची कायदेशीर जबाबदारी ही सामनेवाला क्रं.१ याची आहे. अर्जदाराने तिच्याकडे उत्पन्नाचे साधन नसल्याचे कथन केले आहे.

त्यामूळे सामनेवाला कं.१ कडे तिच्या पालनपोषनाची जबाबदारी कायद्याने आहे.

**१६**. अर्जदाराने तिच्याकडे उत्पन्नाचे साधन नाही, ती उपाशीपोटी जीवन जगत आहे, ती चरितार्थ चालविण्यास असमर्थ आहे, तिच्याने मोलमजूरीचे व कलाकुसरीचे काम होत नाही व तिचा सांभाळ करण्याची कायदेशीर जबाबदारी ही सामनेवाला कं.१ यांची आहे असे कथन केले आहे. सामनेवाल्याने अर्जदारकडे काय उत्पन्नाचे साधन आहे याचे कथन न करता तिच्या वडीलाकडे जमीन व किराणा मालाचे दुकान असल्याचे कथन केले आहे. ज्याअर्थी अर्जदार ही सामनेवाला कं.१ याची पत्नी आहे त्याअर्थी तिच्या वडीलाकडे असलेली कसलीही संपती अर्जदाराला पालनपोषनासाठी जबाबदार धरता येणार नाही. सामनेवाल्याने अर्जदाराकडे कसलेही उत्पन्नाचे साधन असल्याचे सांगितले नाही. त्यामूळे प्रथमदर्शनी अर्जदाराकडे उत्पन्नाचे साधन नाही असे दिसते. अर्जदाराने शपथेवर कथन केले आहे की, सामनेवाला कं.१ हा न्यू इंग्लिश पॉलिटेकनीक शाहूपूरी सातारा येथे क्लार्क म्हणून नोकरीस असून त्याला दरमहा रू.१२,०००/— पगार मिळतो. परंतू अर्जदाराने त्याबाबत कसलाही प्रथमदर्शनी पुरावा दाखल केलेला नाही. सामनेवाल्याने तो नोकरीला असल्याबाबतची बाब स्पष्टपणे नाकारली नसून त्याने केवळ त्याला त्याच्या कामावरून काढून टाकण्यात आले आहे व त्यांच्याकडे कोणताही कामधंदा नसल्याचे कथन केले आहे. परंतू सामनेवाल्याने प्रथमदर्शनी अर्जदार कथन करते त्याप्रमाणे तो नोकरीस नाही अथवा त्याला काढून टाकले आहे याचा प्रथमदर्शनी पुरावा दिलेला नाही. त्यामूळे अर्जदार कांहीना कांही कामधंदा करतो असे प्रथमदर्शनी म्हणावे लागेल. अर्जदाराने सामनेवाला फोटोग्रॉफी व्यवसाय करतो, त्यापासून त्याला दरमहा रू.३०,०००/—मिळतात, त्याच्याकडे ५ ते ६ खोल्या असून वरच्या मजल्याचे दरमहा ५,०००/—भाडे मिळते असे कथन केले आहे. परंतू वरील दोन्ही बाबीबाबत अर्जदाराने कोणताही पुरावा दिलेला नाही. सामनेवाल्यानेही त्याबाबी स्पष्टपणे नाकारलेल्या नाहीत अथवा त्याबाबत अद्याप दोन्ही बाजूकडून पुरावा आलेला नाही. अर्जदाराने सामनेवाली कं.२ ही नोकरीस असल्याबाबत कथन केले आहे परंतू तिचे उत्पन्न ग्राहय धरता येणार नाही. एकंदरीत अर्जदाराकडे प्रथमदर्शनी उत्पन्नाचे साधन दिसत नाही व सामनेवाल्याकडे कथीत नोकरी अथवा कथीत फोटोग्रॉफीचा व्यवसाय अथवा तो सदृढ असल्याने कांहीनाकांही कामधंदा करतो व कांहीना कांही उत्पन्न मिळवतो असे ग्राहय धरणे आवश्यक आहे. वर नमूद केल्याप्रमाणे सामनेवाला कं.१ ने अर्जदारासोबतचे नातेसंबंध मान्य केले आहेत, तिला सांभाळण्याची

जबाबदारी त्याची आहे, ते दोघे एकमेकापासून वेगळे राहत असून प्रस्तूत मुख्य अर्ज निकाली निघण्यास वेळ लागणार असल्याने तोपर्यंन्त अर्जदाराच्या पालनपोषनाची गरज लक्षात घेता तिला अंतरीम पोटगी देणे आवश्यक दिसते. अर्जदाराने शपथेवर केलेल्या सामनेवाला कं.१ च्या उत्पन्नाच्या कथनाबाबत प्रथमदर्शनी निष्कर्ष काढून सामनेवाला कं. १ ने अर्जदाराला प्रस्तूत अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रू. २,०००/— अंतरीम पोटगी प्रस्तूत मूख्य अर्जाचा निकाल लागेपर्यंन्त आदेश देणे न्यायाचे दिसते. सबब, खालील आदेश :—

**आ दे श**

| | |
|---|---|
| १) | अर्जदाराचा **निशाणी १३** वरील अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो. |
| २) | सामनेवाला कं.१ ने प्रस्तूत मुख्य अर्ज दाखल तारखेपासून अर्ज अंतिमरित्या निकाली काढेपर्यंन्त दरमहा रू. २,०००/— अंतरीम पोटगी देण्याचा आदेश याद्वारे देण्यात येतो. |

खुल्या न्यायालयात टंकलिखीत व घोषीत केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Dataraj Gunajirao Patwe
Date: 2021.03.02 17:23:16 +0530

दिनांक : ०२/०३/२०२१

**(डॉ. डी. जी. पटवे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भूम.
**न्यायालय क.२**

**Certificate**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of typist | ... | Shri M.G.Vihalkar(Peon) |
| Court | ... | 2nd Jt.CJJD &JMFC Bhoom |
| Date | ... | 02-03-2021 |
| Order signed by the Presiding Officer on | ... | 02-03-2021 |
| Order uploaded on | ... | 02-03-2021 |